# जिल्हा परिषद रत्नागिरी.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र. ०२३५२-२२०३४१ ई-मेल :-sbmzpratnagiri३@gmail.com


जा.क्र.रजिप/पावस्व/आस्था/उप.पाणी.गुण.भरती/७००/२०२३, दिनांक :-१३/०६/२०२३

# स्वारस्य अभिरूची प्रस्ताव

विषय - JJM अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात बाहयस्थ यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून देणे बाबत...

मा.मिशन संचालक राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांचेकडील पत्र क्र रापास्वमि ०५२०/ प्र.क्र.६२ पापु-२५ दिनांक १६.१२.२०२१ चे पत्रानुसार खालील प्रपत्र अ मधील उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) ही ०७ पदे बाहयस्थ यंत्रणेमार्फत भरावयाची आहेत जल जीवन मिशन अंतर्गत बाहयस्त्रोताव्दारे भरावयाच्या प्रस्तुत पदाचा कालावधी ३१ मार्च २०२४ पर्यंत राहील. या पदांची शैक्षणिक पात्रता अनुभव मानधन खालील प्रपत्र अ प्रमाणे आहे.

**प्रपत्र अ**

उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) या पदासाठीची शैक्षणिक अर्हता, मानधन, अनुभव इत्यादीचा तपशिल पुढील प्रमाणे -

| Sr. No. | Proposed Post | Educational Qualification and Experience | No. of Posts | Remuration per HR/ month in INR |
|---|---|---|---|---|
| 1) | Sub Divisional Coordinator (Water Quality) | १२th Science (BSc in Chemistry/ Environmental Science/ Microbiology will Preference) | ७ | ११,७७०/- त्यामध्ये सेवा शुल्क (सुमारे १४%) व GST (१८%) |
| | | Experience – 3 years experience in Water Quality work. Candidate have experience in Govt. related Water Quality Monitoring and Surveillance Program will have more preference. Good Knowledge of MS office, Internet | | |

**प्रपत्र ब**

| अ. क्र. | उपविभागाचे नाव | पदसंख्या |
|---|---|---|
| १) | मंडणगड व दापोली | १ |
| २) | खेड | १ |
| ३) | चिपळुण | १ |
| ४) | गुहागर | १ |
| ५) | संगमेश्वर | १ |
| ६) | रत्नागिरी | १ |
| ७) | लांजा व राजापूर | १ |
| | एकूण - | ७ |

वरील प्रमाणे उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता ) ०७ पदे, या कार्यालयासाठी बाहयस्थ यंत्रणेमार्फत भरावयाची असल्याने इच्छुक व पात्र पुरवठादार / संस्थां/ विक्रेते यांचेकडून खालील प्रपत्रात दर्शविले प्रमाणे स्वारस्य अभिरुची प्रस्ताव बंद लखोटयातून मागविणेत येत आहेत.

इच्छूक पुरवठादार/संस्था व विक्रेते यांनी दरपत्रके दिनांक २२/६/२०२३ रोजी ३.०० वाजेपर्यंत पाहोचतील अशा बेताने टपाल कक्ष, जि.प. रत्नागिरी येथे सादर करावीत. मुदतीनंतर प्राप्त स्वारस्य अभिरुची प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. प्राप्त प्रस्तावांपैकी कोणताही प्रस्ताव अथवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अथवा सदर प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवले आहेत.

## १. तांत्रिक लखोटा

१.संस्था नोंदणी प्रमाणपत्र

२. पॅनकार्ड

३. GST प्रमाणपत्र

४. यापूर्वी किमान ११ महिन्यासाठी मनुष्यबळ पुरवठा केले बाबतचे शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडून घेतलेले अनुभवाचे प्रमाणपत्र

५. आयकर विवरण पत्र आर्थिक वर्ष २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३

६. प्रस्तावा सोबत जोडलेल्या अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र

## २. व्यापारी लखोटा

| अ क्र | जल जीवन मिशन अंतर्गत बाहयस्थ यंत्रणे मार्फत भरावयाचे पदाचे नाव | मंजुर पद संख्या | ०१ पदाचे मासिक मानधन | सेवा कर | GST | मानधन, सेवा कर व GST सहीत एकूण मासिक खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) | ७ | ११७७०/- | | | |

## अटी व शर्ती

१. सेवा पुरवठादार यांनी त्यांचे कडील सर्व नोंदणी प्रमाणपत्रांची एक साक्षांकित प्रत या कार्यालयाकडे सादर करावी

२. पुरवठा आदेश दिल्यानंतर मुदतीत कर्मचारी उपलब्ध करुन न दिल्यांस व जादा दराने कर्मचारी नियुक्त करावा लागल्यांस होणारा जादा खर्च पुरवठादाराकडुनवसुल केला जाईल.

३. बाहयस्थ यंत्रणेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष जबाबदारी या कार्यालयाकडे रहाणार नाही. जोखमीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आवश्यक तो विमा उतरविणे ही पुरवठादाराची जबाबदारी राहिल, त्यासाठी कोणतीही नुकसान भरपाई या कार्यालयाकडून दिली जाणार नाही.

४.पुरवठा केलेले कर्मचारी हे अभिकर्त्यांचे कर्मचारी (नोकर) असतील. पुरवठा केलेल्या एखादया कर्मचाऱ्यांचे काम असमाधानकारक असल्यांस त्या ऐवजी त्वरीत दुसरा कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

५. अभिकर्त्यांची सुरक्षा अनामत म्हणून एकूण कालावधी वेतनाच्या ( ९ महिने) ५ टक्के एवढी रक्कम या कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक आहे.

६. किमान वेतन कायदयाप्रमाणे कर्मचा-यास किमान वेतन देणे बंधनकारक आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे इतर सेवाविषयक कायदे व नियम यांची अंमलबजावणी व तरतुदीचे पालन अभिकर्त्याने करावयांचे आहे.

७. पुरवठादार यांनी नियुक्त करावयाच्या उमेदवाराचा बायोडाटा, तसेच त्यांच्या प्रमाणपत्रांच्या प्राधिकृत् अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या प्रती या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी हजर होते वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. नियुक्त कर्मचाऱ्याला कार्यालयीन वेळेचे पालन करणे बंधनकारक राहील. तथापि कार्यालयीन सुचनेनुसार सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित रहावे लागल्यास त्या दिवशीचा वाढीव मेहनताना संबंधितांना अनुज्ञेय रहाणार नाही.

९. कोणत्या तालुक्यात पदावर कोणता उमेदवार नियुक्त केलेला आहे, याची यादी पुरवठादार यांनी दयावयाची आहे.

१०. पुरवठादाराकडून अथवा कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यांस किंवा तक्रार उदभवल्यांस सदरचा ठेका रदद करण्यांत येईल व त्याबाबतची कोणतीही नुकसान भरपाई मागता येणार नाही, अथवा कोणत्याही न्यायालयांत कोणताही दावा दाखल करण्यांत येणार नाही.

११. कोणत्याही कर्मचाऱ्यांचे काम असमाधानकारक असल्यास त्यास कामातून मुक्त करण्यांचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवलेले आहेत.

१२. केंद्र शासन, महाराष्ट्र शासनाने किमान वेतनात/विशेष भत्यांत वाढ केल्यांस त्याप्रमाणे सदरील कर्मचाऱ्यांना वाढीव दराने वेतन अदा करणेची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१३. शासनाचे प्रचलित नियमानुसार वेळोवेळी कपात करण्यांत येणाऱ्या शासकीय वजाती (आयकर, जी.एस.टी.पीटी ) इत्यादी व अनुषंगीक वजावटी करुन संबंधित खाती जमा करण्यांची जवाबदारी पुरवठादाराची राहिल. व त्याची प्रत देयक सादर करतेवळी सादर करणे बंधनकारक आहे.

१४. बाहय यंत्रणेकडून दर निश्चित करण्यांत आलेल्या दरांची अदाई शासनाकडून अनुदान उपलब्ध होईल तसे संस्थेला अदा केले जाईल याची नोंद घ्यावी. तथापि संबंधितांचे मानधन देणेसाठी शासन स्तरावरुन अनुदान उपलब्ध होण्यांस विलंब झाला तरीही नियुक्त कर्मचारी, यांना प्रतिमहा मानधन देणे संबंधित बाहयस्थ यंत्रणेवर बंधनकारक राहील. तसेच संबंधितांचे मानधन बँक खाती जमा केल्याची पावती या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१५. संबंधित कर्मचारी कामावर असताना त्यांना अपघात अथवा इजा झाल्यांस त्याची नुकसानभरपाई करणेची जबाबदारी संबंधित बाहय यंत्रणेची राहिल.

१६. प्रस्ताव मंजूर करणे अगर नाकारणे अथवा आवश्यक वाटल्यास विभागून देणे हे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवलेले आहेत.

१७. वरील अटी व शर्ती शिथिल करणे अथवा रदद करणे किंवा त्यामध्ये वाढ करणेचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवलेले आहेत.

१८. स्वारस्य अभिरुची प्रस्ताव मंजुर झालेल्या संस्थेने, र.रु. ५००/- च्या बाँड पेपर नोंदणीकृत करुन वर वरील अटि शर्ति मंजुर असले बाबत करार नामा सादर करणे बंधनकारक राहील.

जाहिरातीचा प्रारुप –

| |
|---|
| **महाराष्ट्र शासन**<br>**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि.प.रत्नागिरी.**<br>**स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)**<br>जल जीवन मिशन अंतर्गत बाह्यस्थपध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून विहीत नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन. |
| जल जीवन मिशन अंतर्गत रत्नागिरी जिल्हयात २०२३-२४ साठी उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) या पदावर बाह्यस्थपध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. याबाबतचे कामाचे प्रारुप, अटी व शर्ती https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| अध्यक्ष,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी - ४१५६१२<br>दुरध्वनी क्र.०२३५२-२२०३४१ E.mail - sbmzpratnagiri३@gmail.com |
| ऑनलाईन अर्ज स्वीकारणेची शेवटची तारीख दि22/९/२०२३ रोजी सायंकाळी ३.०० पर्यंत |

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**